## विशेष दिवाणी दावा क्र. २४७/२०२५ मधील निशाणी ९५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दाव्यात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. वादींचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, वादी व प्रतिवादी क्र. ४७ व ४८ यांच्यात तडजोड होवुन प्रतिवादींनी वादींना त्यांचा कायदेशीर हिस्सा आर्थिक स्वरूपात दिलेला असल्याने वादींचे प्रतिवादी क्र. ४७ व ४८ या अनुषंगाने प्रतिवादी क्र. २२ ते ४६ यांच्या विरोधात वाद राहीलेला नसल्याने दाव्यातील दावा भुखंड क्र. ८१ सेक्टर ७, क्षेत्र ७१० चौ.मी बाबतचा दावा विनाशर्त मागे घेतलेला असुन सदरहु प्रतिवादी व भुखंडाबाबतचा मजकुर काढुन टाकणे आवश्यक आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, दाव्याच्या सरनाम्यातील प्रतिवादी क्र. २२ ते ४६ यांना प्रतिवादीपणातुन कमी करण्यात यावे व प्रतिवादी क्र. ४९ यांच्या ऐवजी प्रतिवादी क्र. २३ व त्यांच्या कार्यालय ४९ ऐवजी २३/१, २३/२, २३/३ अशी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन कले की, दाव्याच्या शिर्षकामधील दि. ०५/०७/२०२२ रोजीचा भाडेपट्टा करारनामा तसेच दि. ०३/०५/२०२४ व १९/०३/२०२४ रोजीचा त्रिपक्षीय करारनामा रद्द करून मिळण्याकरिता हा मजकुर काढुन टाकणे तसेच परिच्छेद क्र. ५ मधील ७१० चौ.मी मजकुर काढुन प्रतिवादी क्र. १ ते ४६ ऐजवी १ ते २१ नमुद करणे तसेच परिच्छेद क्र. ६ मधील भुखंड क्र. ८१ पासुन पान क्र. ९ मधील संपुर्ण मजकुर आलेला आहे पर्यंत मजकुर काढुन टाकणे व ओळ क्र. २ मधील दोन्ही शब्द परिच्छेद क्र. ७ मधील भुखंड क्र. ८१ पासुन संपुर्ण मजकुर तसेच परिच्छेद क्र. ८ मधील दोन्ही हा शब्द तसेच परिच्छेद क्र. ९ व १० मधील संपुर्ण मजकुर काढणे आवश्यक आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, परिच्छेद क्र. ११ यास परिच्छेद क्र. ९ देणे व परिच्छेदास प्रतिवादी क्र. १ ते ४६ ऐवजी १ ते २१ नमुद करणे तसेच नोटीस पासुन नोटीसीस उत्तर देईपर्यंतचा मजकुर काढुन प्रतिवादी क्र. १ ते

२१ यांनी कोणतेही उत्तर दिले नाही असे नमुद करणे व परिच्छेद क्र. ११ मध्ये त्रिपक्षीय करारनामे वादींच्या हिश्यापुर्ते रद्द करून मिळण्याकरिता व परिच्छेद क्र. १२ मधील भुखंड क्र. ८१ पासुन त्रिपक्षीय करारनामे पर्यंतचा मजकुर तसेच ओळ क्र. ६ मधील भुखंड क्र. ८१ पासुन प्रतिवादी क्र. ४८ यांच्या नावाने नोंदविल्यापर्यंतचा मजकुर व प्रतिवादी क्र. ४८ पासुन विकसित करून पर्यंतचा मजकुर तसेच ओळ क्र. १४ मधील ४८ हा मजकुर काढुन प्रतिवादी क्र. ४९ ऐवजी २२ नमुद करणे आवश्यक आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, परिच्छेद क्र. १६ मधील प्रतिवादी क्र. ४७ ऐजवी २२ नमुद करणे व प्रतिवादी क्र. ४८ पासुन मजकुर मागणी नाकारल्यापर्यंत काढुन प्रतिवादी क्र. ४९ ऐवजी २२ नमुद करणे आवश्यक आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, परिच्छेद क्र. १८ मध्ये दि. ०५/०७/२०२२ पासुन २००/- रूपयांचा स्टॅम्प देत असल्यापर्यंतचा मजकुर काढुन परिच्छेद क्र. १९ ऐजवी १४ नमुद करणे तसेच मागणी कलम 'ब' मधील भुखंड क्र. ८१ पासुन मजकुर निर्तुटक करून मिळावा पर्यंत काढुन प्रतिवादी क्र. १ ते ४६ ऐवजी १ ते २१ नमुद करणे आवश्यक आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, मागणी कलम 'ड' काढुन मागणी कलम 'ई' ला 'ड' म्हणुन वाचण्यात यावे व मागणी कलम 'ई' ला 'इ' म्हणुन वाचण्यात यावे त्यातील मजकुर कलम क, ड, इ पैकी 'इ' काढुन मागणी कलम 'उ' काढुन मागणी कलम 'उ' ला 'ई' वाचण्यात यावे व मागणी कलम 'ए' व 'ऐ' काढुन 'ओ' व 'औ' ऐवजी 'उ' व 'ऊ' नमुद करणे तसेच प्रविादी क्र.१ ते २१ तसेच सिडको यांच्याविरूध्द दावा चालु ठेवणे असल्याने तशी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरूस्ती केल्याने दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल घडुन येत नाही.

३. प्रतिवादी यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, अर्जास कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नसुन अर्ज फेटाळण्यात यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन करता व वादी तसेच प्रतिवादी यांचे वि.अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसून येते की, सदरहु दावा ठराव वाटप वारस दाखले, त्रिपक्षीय करार भाडेपट्टा रद्द करून मिळण्याकरिता व निरंतर मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरूस्ती केल्यास दाव्याच्या स्वरूपात कुठलाही बदल होत नाही. प्रकरण गुणवत्तेर निकाली काढण्यासाठी व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने सदरहू अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. म्हणून खालील आदेश करण्यात येत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींना दाव्यात प्रार्थित दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

sd/-
**(ए. एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल

पनवेल
दिनांक २१/०८/२०२५.